MHDH010013482024

| | | |
|---|---|---|
| दाखल तारीख | : | २७.०३.२०२४ |
| नोंदणी तारीख | : | २७.०३.२०२४ |
| निकाल तारीख | : | ११.०३.२०२६ |
| कालावधी | : | ०१व.११म.१४दि |

## धुळे येथील अतिरिक्त तदर्थ जिल्हा न्यायाधीश-१ यांच्या न्यायालयात
**(पिठासीन अधिकारी - एस.जे. गायकवाड)**

**सत्र खटला क्र. ३६/२०२४**
**नि.क्र.४०/ए**

| |
|---|
| गुन्हा रजिष्टर क्र.२३२/२०२३, धुळे शहर पोलिस ठाणे, ता. जि. धुळे. |

| | | |
|---|---|---|
| अभियोगपक्ष | | महाराष्ट्र शासन,<br>मार्फत- किशोर हिंमतराव बाविस्कर,<br>अन्न सुरक्षा अधिकारी, अन्न व औषध प्रशासन कार्यालय, धुळे. |

| | | |
|---|---|---|
| प्रतिनिधित्व | : | श्री. अजय सानप, अतिरिक्त सरकारी अभियोक्ता. |

| | | |
|---|---|---|
| आरोपी | : | नितेश प्रकाशलाल अहुजा,<br>वय – ३० वर्षे, व्यवसाय – ड्रायव्हर,<br>रा. ब्लॉक नं. ओ-१, रुम नं. ०९, कुमार नगर, साक्री रोड, धुळे, ता. जि. धुळे. |

| | | |
|---|---|---|
| प्रतिनिधित्व | : | आरोपीतर्फे श्री. एन.जी. दुसाने वकील. |

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | १०.०६.२०२४ |
| खबर/फिर्याद नोंदणीची दिनांक | : | १०.०६.२०२४ |
| दोषारोपपत्राचा दिनांक | : | १३.०९.२०२४ |
| दोष ठेवण्याचा दिनांक | : | १८.०९.२०२५ |

| | | |
|---|---|---|
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | : | १४.११.२०२५ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवण्यात आल्याचा दिनांक | : | ००.००.०००० |
| न्यायनिर्णयाचा दिनांक | : | ११.०३.२०२६ |
| शिक्षा ठोठावण्याचे आदेशाचा दिनांक/जर काही | : | - |

**आरो**पीचा **तपशीलः**

| किती आरोपी | आरोपीचा नांव | अटक केल्याचे दिनांक | सोडल्याचे दिनांक | ठेवलेले आरोप | निर्दोष असो व दोषी | ठोठावलेली शिक्षा | संपरीक्षा चालु असतांना आरोपींना स्थानबध्द करुन ठेवल्याचा कालावधी - फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४२८ करीता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | नितेश प्रकाश-लाल आहुजा | १०.०६ २०२३ | २०.०६ २०२३ | ३२८, २७२, २७३, १८८ भा.दं.वि. संहिता व कलम २६(२)(iv),२७(३)(डी), २७(३)(इ), ३०(२)(a) ३(१)(zz)(v) सह कलम ५९ अन्न सुरक्षा मानके | निर्दोष मुक्त करण्यात आले. | निर्दोष मुक्त करण्यात आले. | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अधिनियम अन्वये. | | | |

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी.

**अ. अभियोगपक्ष**

| | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | सागर सतीष अहिरराव | घटनास्थळ पंच |
| साक्षीदार क्र.२ | किशोर हिम्मतराव बाविस्कर | फिर्यादी |
| साक्षीदार क्र.३ | विजय निंबा शिरसाठ | साक्षीदार |
| साक्षीदार क्र.४ | प्रशांत जयसिंग राठोड, | तपासणी अधिकारी |

बचावपक्षाचे साक्षीदार - नाही.

न्यायालयीन साक्षीदार - नाही.

अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी -

अ. अभियोगपक्ष

| **अ.क्र.** | **नि.क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | २१ | तपासणी अहवाल |
| २ | २२ | मेमोरंडम |
| ३ | २३ | फिर्याद |
| ४ | २४ | प्रयोग शाळेला दिलेले पत्र |
| ५ | २५ | धुळे शहर पोलीस स्टेशन येथे विश्लेषण अहवालाची प्रत पाठविणेबाबतचे पत्र |
| ६ | २६ | विश्लेषण अहवाल |
| ७ | २७ | मुद्देमाल साठा नष्ट करण्याबाबतचा परवानगी अर्ज. |
| ८ | २८ | सहायक आयुक्त, धुळे यांचा आदेश. |
| ९ | २९ | मुद्देमाल नष्ट केल्याबाबतचा पंचनामा. |
| १० | ३३ | मुद्देमाल जप्ती पंचनामा. |
| ११ | ३४ | जप्त मुद्देमालाबाबत अन्न सुरक्षा अधिकारी, धुळे यांना दिलेले पत्र. |
| १२ | ३५ | तपास आदेश. |

| | | |
|---|---|---|
| १३ | ३६ | आरोपीचा अटक पंचनामा |
| १४ | ३७ | जप्त मुद्देमाल पावती |

ब. बचावपक्ष - निशाणी - काही नाही.

क. न्यायालयातर्फे - निशाणी -

| **अ.क्र.** | **न्यायालयातर्फे नि.क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | ३८ | अभियोगपक्षातर्फे पुरावा बंद पुर्सिस |
| २ | ३९ | आरोपीचा फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ प्रमाणे नोंदवण्यात आलेले जबाब |

ड. सामग्री वस्तुः

| अ.क्र. | वस्तु क्र. | वर्णन |
|---|---|---|
| - | - | - |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

( <u>दिनांक ११ मार्च, २०२६</u> )

आरोपी हा भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२८, २७२, २७३, १८८ व अन्न सुरक्षा मानके अधिनियमचे कलम २६(२)(iv), २७(३)(डी), २७(३)(इ), ३०(२)(a) ३(१)(zz)(v) सह कलम ५९ चे गुन्हयाच्या चौकशीस सामोरे जात आहे.

२. सरकार पक्षाच्या खटल्याची थोडक्यात हकीकत अशी की, किशोर हिंमतराव बाविस्कर हे अन्न व औषध प्रशासन (महारष्ट्र राज्य), धुळे येथे अन्न सुरक्षा अधिकारी म्हणुन कार्यरत असुन दि. १०.०६.२०२३ रोजी धुळे शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना गुप्त माहिती मिळाली की, सुरत बायपास कडुन धुळे शहरात विद्यावर्धीनी कॉलेजजवळ एका ऑरेंज रंगाचे स्वीप्ट कार क्र. एम.एच.१८टी/१२५३ या वाहनातुन पान मसाला व सुगंधीत तंबाखुची विक्रीसाठी वाहतुक होणार आहे. त्यानुसार शोध पथकातील पोलीस हवलदार विजय शिरसाठ, पोलीस नाईक कुंदन पटाईत, पोलीस शिपाई महेश मोरे, प्रविण पाटील, मनिष सोनगिरे, पोलीस हवलदार मच्छींद्र पाटील, पोलीस शिपाई निलेश पोतदार, तुषार मोरे, अविनाश कराड, प्रसाद वाघ, गुणवंत पाटील, शाकीर शेख, केतन पाटील व पोलीस उपनिरीक्षक प्रशांत राठोड यांनी सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास साक्री रोडवरील सुरेंद्र दुध डेअरी जवळ वरील वाहन चालकास थांबवुन त्याचा परिचय विचारला असता, त्याने त्याचे नांव नितेश प्रकाशलाल अहुजा असे सांगीतले. पोलीसांनी सदर वाहनाची तपासणी केली असता, वाहनात महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत असलेले विमल पान मसाला ३०० पाकीट, व्ही-१ तंबाखु ३०० पाकीट, विमल पान मसाल ६० पाकीट असा एकुण ७९,२००/- रुपयाचा मुद्देमाल साठा विक्रीसाठी वाहतुक करतांना मिळुन आल्याने सदरची बाब त्यांनी अन्न सुरक्षा अधिकारी यांना कळविले वरुन अन्न सुरक्षा अधिकारी हे

धुळे शहर पोलीस स्टेशन येथे हजर होवुन सदरचे मुद्देमाल पान मसाला व सुगंधीत तंबाखुच्या साठयातुन प्रातिनीधीक प्रत्येकी एक नमुना पाकीट घेवुन उर्वरीत साठा अन्न व औषध प्रशासन, धुळे कार्यालयात सुरक्षीत ठेवण्यात आला. तसेच, स्वीप्ट कार क्र. एम.एच.१८टी/१२५३ हे वाहन जप्त करुन सुरक्षेचे कारणास्तव धुळे शहर पोलीस स्टेशन येथे ठेवण्यात आले. आरोपी नितेश प्रकाशलाल अहुजा यांनी महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात प्रतिबंधीत केलेल्या अन्न पदार्थाची विक्रीसाठी वाहतुक करुन अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम २६(२) (iv), २७(३) (ड), २७(३) (इ), कलम ३(१) (zz) (i), ३(१) (zz) (v) तसेच कलम ५९(i) व भारतीय दंड विधान संहितेचे कलम १८८, २७२, २७३ व ३२८ चे उल्लंघन केल्याने अन्न सुरक्षा अधिकारी यांनी आरोपी विरोधात धुळे शहर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केले वरुन आरोपीचे विरोधात धुळे शहर पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. २३२/२०२३ ची नोंद होवून सदर गुन्हयाचा तपास पोलीस उप निरीक्षक प्रशांत राठोड तपास अधिकारी यांचेकडे सुपुर्द करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले. आरोपीस अटक पंचनाम्यासह अटक केली, तसेच याकामी अन्न व सुरक्षा अधिकारी यांनी तयार केलेले तपासणी अहवाल, मेमोरेंडम, पंचनामा तसेच अन्न विश्लेषक, अन्न व औषध प्रशासन प्रयोगशाळा संभाजीनगर यांचे सोबत केलेल्या पत्र व्यवहाराची कागदपत्रे प्राप्त करुन तपासाअंती आरोपी विरोधात वरील गुन्हया अंतर्गत आरोपपत्र दाखल केले.

३. सदरचा गुन्हा हा सत्र न्यायालयात चालत असल्यामुळे विव्दान मुख्य न्यायदंडाधिकारी, धुळे यांनी दिनांक १६.०३.२०२४ रोजी नि.क्र.१ वर योग्य तो आदेश पारीत करुन सदरचा खटला सत्र न्यायालयात वर्ग केला.

४. मी आरोपी विरोधात नि.क्र. १० वर आरोप निश्चित करुन त्यातील मजकुर आरोपीस वाचुन दाखविला असता, आरोपीने गुन्हा नाकबुल करुन गुन्हयाच्या चौकशीस सामोरे जाण्याचे ठरविले.

५. सरकारपक्षाच्या खटल्याच्या हकीकतीवरुन चर्चेकरीता खालील मुद्दे उपस्थीत झालेले असुन त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक १०.०६.२०२४ रोजी ०७.३० वाजेचे सुमारास धुळे शहरात साक्री रोडवरील सुरेंद्र दुध डेअरी जवळ आरोपीने त्याचे ताब्यातील स्वीफ्ट कार क्र. एम.एच.१८टी/१२५३ या वाहनामध्ये शासनाने विक्री व वितरण करण्यास प्रतिबंध केलेला मुद्देमाल विमल पानमसाला व व्ही-१ सुगंधीत तंबाखु विक्री करण्याचे उद्देशाने प्राप्त करुन साठवुन ठेवल्याचे सरकार पक्ष शाबीत करते काय ? | **नाही.** |
| २. | वरील तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपीने असुरक्षित आणि प्रतिबंधीत अन्न पदार्थ विमल पानमसाला व व्ही-१ सुगंधीत तंबाखु विक्री करण्याचे उद्देशाने प्राप्त करुन साठवुन ठेवल्याचे सरकार पक्ष शाबीत करते काय ? | **नाही.** |
| ३. | वरील तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपीने असुरक्षित आणि प्रतिबंधीत अन्न पदार्थ विमल पानमसाला व व्ही-१ सुगंधीत तंबाखु विक्री करण्याचे उद्देशाने प्राप्त करुन साठवुन ठेवला व सदरचा अन्न पदार्थ असुरक्षित असल्याचे आरोपीस माहिती होती हे सरकार पक्ष शाबीत करते काय ? | **नाही.** |
| ४. | वरील तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपीने असुरक्षित आणि प्रतिबंधीत अन्न पदार्थ विमल पानमसाला व व्ही-१ सुगंधीत तंबाखु शासनाने सदर अन्न पदार्थची वाहतुक व विक्री करण्यापासुन दुर राहण्याचे विशीष्ट आदेशव्दारे निर्देश दिलेले असतांना व सदर आदेशाचे आरोपीने उल्लंघन केल्याचे सरकार पक्ष शाबीत | |

| | | |
|---|---|---|
| | करते काय ? | **नाही.** |
| ५. | वरील तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपीने असुरक्षित आणि प्रतिबंधीत अन्न पदार्थ विमल पानमसाला व व्ही-१ सुगंधीत तंबाखु विक्री करण्याचे उद्देशाने प्राप्त करुन साठवुन ठेवला जो की शासनाने लोकांचे जिवीतास हानी होवु नये म्हणुन प्रतिबंधीत केलेला आहे हे सरकार पक्ष शाबीत करते काय ? | **नाही.** |
| ६. | वरील तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपीने असुरक्षित आणि प्रतिबंधीत अन्न पदार्थ विमल पानमसाला व व्ही-१ सुगंधीत तंबाखु विक्री करण्याचे उद्देशाने प्राप्त करुन साठवुन ठेवला जो की शासनाने लोकांचे जिवीतास हानी होवु नये म्हणुन प्रतिबंधीत केल्याचे सरकार पक्ष शाबीत करते काय ? | **नाही.** |
| ७. | वरील तारखेस, वेळेस व ठिकाणी आरोपीने शासकीय राजपत्रात सुचित केल्याप्रमाणे असुरक्षित आणि प्रतिबंधीत अन्न पदार्थ विमल पानमसाला व व्ही-१ सुगंधीत तंबाखु साठवणुक, हाताळणी किंवा बाळगल्याचे सरकार पक्ष शाबीत करते का ? | **नाही.** |
| ८. | आदेश काय ? | **....अंतीम आदेशाप्रमाणे** |

## <u>कारणमिमांसा</u>

६. आरोपी विरुध्दचा गुन्हा शाबीत करण्याकरीता सरकारपक्षाने याकामी खालीलप्रमाणे साक्षीदारांचा जबाब नोंदविला.

| | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र.१ | सागर सतिष अहिरराव | पंच |
| साक्षीदार क्र.२ | किशारे हिम्मतराव बाविस्कर | फिर्यादी |
| साक्षीदार क्र.३ | विजय निंबा शिरसाठ | साक्षीदार |

| | | |
|---|---|---|
| साक्षीदार क्र. ४ | प्रशांत जयसिंग राठोड | तपासणी अधिकारी |

७. खालीलप्रमाणे कागदपत्रांना निशाणी क्रमांक देण्यात आले आहे.

| अ.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | २१ | तपासणी अहवाल. |
| २ | २२ | मेमोरंडम |
| ३ | २३ | प्रथम खबर |
| ४ | २४ | प्रयोग शाळेला दिलेले पत्र |
| ५ | २५ | धुळे शहर पोलीस स्टेशन येथे विश्लेषण अहवालाची प्रत पाठविणेबाबतचे पत्र. |
| ६ | २६ | विश्लेषण अहवाल |
| ७ | २७ | मुद्देमाल साठा नष्ट करण्याबाबतचा परवानगी अर्ज. |
| ८ | २८ | सहायक आयुक्त, धुळे यांचा आदेश. |
| ९ | २९ | मुद्देमाल नष्ट केल्याबाबतचा पंचनामा. |
| १० | ३३ | मुद्देमाल जप्ती पंचनामा. |
| ११ | ३४ | जप्त मुद्देमालाबाबत अन्न सुरक्षा अधिकारी, धुळे यांना दिलेले पत्र. |
| १२ | ३५ | तपास आदेश. |
| १३ | ३६ | आरोपीचा अटक पंचनामा. |
| १४ | ३७ | जप्त मुद्देमाल पावती. |

८. नि.क्र.३८ वर सरकार पक्षाने पुरावा बंद पुरशीस सादर केली. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

**<u>मुद्दा क्र. १ ते ८ करीता</u>**

९. वरील आठही मुद्दे एकमेकांशी निगडीत असल्याकारणाने चर्चेची पुर्नावृत्ती टाळण्याच्या उद्देशाने वरील आठही मुद्दे चर्चेकरीता एकत्रीत घेण्यात आले. दोन्ही बाजुचा युक्तीवाद ऐकुन घेतल्यानंतर, सरकार पक्षाने सादर केलेल्या जाबजबाबाचे अवलोकन

केले असता सागर अहिरराव (सा.क्र. १ ) जप्ती पंचनाम्यावरील पंच यांनी सरकार पक्षाच्या केसला अनुसरुन जबाब दिला नसल्याने सरकार पक्षाच्या वतीने त्यांचा उलटतपास घेण्यात आला या बाबीचा विचार केल्यास सरकार पक्षाच्या खटल्याच्या दृष्टीने सदर साक्षीदाराचा जबाब महत्वाचा दिसुन येत नाही.

१०. किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) फिर्यादी यांचे जबाबात असे आले आहे की, जुलै २०२० ते ऑगष्ट २०२४ या कालावधीत ते अन्न व औषध प्रशासन कार्यालय, धुळे येथे अन्न व औषध प्रशासन अधिकारी म्हणुन कार्यरत होते. त्यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, दि. १५ जुलै २०२२ चे अधिसुचनेनुसार महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र राज्यात गुटखा, पान मसाला, सुगंधीत तंबाखु इत्यादींची विक्री, साठा, वाहतुक व उत्पादन याचेवर बंदी घातलेली आहे.

११. किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, दि. १०.०६.२०२३ रोजी धुळे शहर पोलीसांनी त्यांना त्यांचे भ्रमणध्वनी वरुन माहिती दिली की, त्यांनी पान मसाला व सुगंधीत तंबाखु बाबत कारवाई केलेली असुन त्यांना पुढील कारवाई करीता धुळे शहर पोलीस स्टेशन येथे बोलावलेवरुन ते तेथे गेले.

१२. किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) यांचे जबाबाबत पुढे असे आले आहे की, ते शहर पोलीस स्टेशन, धुळे येथे जावुन तेथे हजर असलेला इसम उत्कर्ष पालेकर यांना पंच म्हणुन राहण्याची विनंती केली व त्याच्यासह ठाणे अंमलदार, धुळे शहर पोलीस स्टेशन यांची भेट घेतली. तेंव्हा ठाणेदार यांनी ज्या इसमाकडुन सुगंधीत तंबाखु व पानमसाला जप्त केला, तो इसम आरोपी नितेश अहुजा यास त्यांना दाखविले. त्यानंतर त्यांनी सुगंधीत तंबाखु व पान मसाला याची तपासणी करुन खात्री केली व नि.क्र. २१ प्रमाणे सदर मुद्देमालाचा तपासणी अहवाल तयार केला. त्यानंतर त्यांनी सदर मुद्देमालातुन एक-एक पाकीट प्रयोग कार्यशाळेत पाठविण्याकरीता काढुन घेवुन नि.क्र.

२२ प्रमाणे त्याचा मेमोरेंडम तयार केला. त्यानंतर त्यांनी आरोपी विरोधात नि.क्र. २३ प्रमाणे फिर्याद दाखल केली.

१३. किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, नि.क्र. २४ ला असलेल्या पत्रानुसार त्यांनी सुगंधीत तंबाखु व पान मसाला याचे एक-एक पाकीट तपासणी करीता प्रयोग शाळेत पाठविले व कार्यशाळेकडुन प्राप्त झालेला अन्न विश्लेषक डॉ. बी.एस. बडदे यांचा नि.क्र. २६ प्रमाणेचा अहवाल त्यांनी नि.क्र. २५ ला असलेल्या पत्रासह धुळे शहर पोलीस स्टेशन यांना पाठविला.

१४. किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, त्यांनी नि.क्र. २७ ला असलेल्या विनंती अर्जानुसार सहायक आयुक्त, धुळे यांच्याकडे वरील मुद्देमाल साठा नष्ट करण्याची परवानगी मागीतल्यावरुन सहायक आयुक्त, धुळे यांनी त्यांना नि.क्र. २८ ला असलेल्या आदेशानुसार वरील मुद्देमाल नष्ट करण्याबाबतची परवानगी दिली. त्यानुसार त्यांनी नि.क्र. २९ ला असलेल्या पंचनाम्यानुसार वरील मुद्देमाल नष्ट केला. अशा प्रकारे किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) यांचे जबाबातुन सरकार पक्षाने नि.क्र. २१ ते २९ ला असलेल्या कागदपत्रातील मजकुर शाबीत करण्याचा प्रयत्न केला असुन, सरकार पक्षाच्या वतीने किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) यांचा उलटतपास घेण्यात आला.

१५. किशोर बाविस्कर (सा.क्र. २ ) यांनी त्यांचे उलटतपासात कबुल केले की, वरील घटनेचा ते साक्षीदार नाहीत. त्यांनी पुढे हेही कबुल केले की, त्यांनी नि.क्र. २१ ला असलेला तपासणी अहवाल व नि.क्र. २२ ला असलेला मेमोरेंडम नि.क्र. २३ ची फिर्याद दाखल करण्यापुर्वी तयार केला होता. त्यांनी पुढे कबुल केले की, नि.क्र. २३ ला असलेल्या फिर्यादमध्ये तपासणी अहवाल व मेमोरेंडम याचा उल्लेख नाही. त्यांनी पुढे हेही कबुल केले की, मुद्देमाल तपासणी करीता प्रयोगशाळेत पोहचल्याबाबत त्यांनी

याकामी कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. त्यांनी पुढे कबुल केले की, प्रयोग शाळेत पाठविण्यात आलेले नमुने चार भागात विभागले नव्हते. या व्यतिरीक्त सदर साक्षीदाराच्या उलटतपासातुन अभिलेखावर काहीही आलेले नाही.

१६. विजय शिरसाठ (सा.क्र. ३ ) यांचे जबाबात असे आले आहे की, दि. १०.०६.२०२३ रोजी ते धुळे शहर पोलीस स्टेशन येथे पोलीस हवलदार म्हणुन कार्यरत असतांना, पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांना गुप्त बातमीदाराकडुन माहिती मिळाली की, सुरत बायपास कडुन धुळे शहरात एक ऑरेज रंगाची स्वीप्ट डिझायर कार एम.एच.१८टी/१२५३ या कार मधुन बंदी असलेला गुटखा वाहतुक करुन घेवुन जात आहे. तेंव्हा पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांनी त्यांच्यासह पोलीस हवलदार मच्छींद्र पाटील, पोलीस नाईक कुंदन पटाईत, पोलीस शिपाई महेश मोरे, मनिष सोनगीरे, निलेश पोतदार व प्रविण पाटील यांना बोलावुन सदर बातमीची खात्री करुन योग्य ती कारवाई करण्याबाबतचे आदेश दिले. त्यानुसार ते साक्री रोडवरील सुरेंद्र दुध डेअरी जवळ सापळा रचुन सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास बातमी मिळाल्यानुसार सुरत बायपास कडुन आलेल्या कारला अडवुन त्यांनी कार चालकास त्याचे नांव गाव विचारले असता, कार चालकाने त्याचे नाव नितेश प्रकाशलाल अहुजा असे सांगीतले.

१७. विजय शिरसाठ (सा.क्र. ३ ) यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, सदर कार चालकास त्यांनी सर्व माहिती देवुन त्यास उद्देश सांगीतला व कारची तपासणी केली असता त्यांना सदर कारमध्ये पांढ-या रंगाच्या गोण्यांमध्ये विमल गुटखा मिळुन आला. तेंव्हा त्यांनी सदर मुद्देमाल कार व पांढ-या रंगाच्या विमल गुटख्याच्या गोण्या घेवुन धुळे शहर पोलीस स्टेशन येथे आले. तेथे पोलीस उपनिरीक्षक प्रशांत राठोड यांनी पोलीस निरीक्षक यांचे आदेशानुसार पंचांसमक्ष पंचनाम्यासह सदर मुद्देमाल जप्त केला व पांढ-या रंगाच्या गोण्यातुन विमल गुटख्याचे पाकीट नमुन्याकरीता पंचांसमक्ष काढुन घेवुन ते सिलबंद केले. त्याचे जबाबात पुढे असे आले आहे की, सदर घटनेबाबतची

फिर्याद अन्न व औषध निरीक्षक बाविस्कर यांनी दिली. अशा प्रकारे सदर साक्षीदाराच्या जबाबातुन सरकार पक्षाने दि. १०.०६.२०२३ रोजी सकाळी ७.३० वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्या निर्देशानुसार त्यांनी आरोपीचे स्वीप्ट डिझायर कार क्र. एम.एच.१८टी/१२५३ या ऑरेंज कलरच्या कारमधुन पांढ-या रंगाचे विमल गुटख्याच्या गोण्या हस्तगत केल्याचे शाबीत करण्याचा प्रयत्न केला आहे. सरकार पक्षाच्या वतीने विजय शिरसाठ (सा.क्र. ३ ) यांचा उलटतपास घेण्यात आला.

१८. विजय शिरसाठ (सा.क्र. ३ ) यांनी त्यांचे उलटतपासात कबुल केले की, ते कोणत्या वाहनातुन पोलीस स्टेशन येथुन कारवाई करण्याकरीता गेले त्या वाहनाचा प्रकार व नंबर तसेच कारवाई करीता किती वाजता निघाले हे त्यांच्या जबाबात नमुद नाही. त्यांनी पुढे हेही कबुल केले की, घटनास्थळासमोर विद्यावर्धीनी कॉलेज असुन घटनास्थळी वर्दळीचा रस्ता आहे. पुढे त्याने कबुल केले की, तपास अधिकारी यास जबाब देण्यापुर्वी त्यांनी अन्न सुरक्षा अधिकारी बाविस्कर यांनी दिलेली फिर्याद वाचुन पाहिली होती. या व्यतिरीक्त सदर साक्षीदाराच्या उलटतपासात अभिलेखावर काहीही आलेले नाही.

१९. प्रशांत राठोड (सा.क्र. ४ ) हे तपास अधिकारी असुन त्यांनी तपासाकामी ज्याकाही औपचारीकता पुर्ण केल्या याबबात जबाब दिलेला असुन त्यांचे जबाबात असे आले आहे की, अन्न सुरक्षा अधिकारी के.एच. बाविस्कर यांनी नि.क्र. २३ ला असलेली फिर्याद दाखल केल्यानंतर सदर गुन्हयाचा तपास नि.क्र. ३५ वर असलेल्या आदेशानुसार त्यांच्याकडे सुपुर्द करण्यात आला. तपासादरम्यान त्यांनी दोन पंचांसमक्ष आरोपीस नि.क्र. ३६ ला असलेल्या अटक पंचनाम्यासह अटक केली. तसेच, नि.क्र. ३७ ला असलेल्या मुद्देमाल पावतीसह मुद्देमाल कारकुनाकडुन मुद्देमाल पावती फाडली व सदर मुद्देमाल मुद्देमाल कक्षात जमा केला. त्यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, आरोपीचे वडिलांनी जप्त स्वीप्ट डिझायर कार बाबत सादर केलेले कागदपत्र त्यांनी

गुन्हयाचे कामी सामील करुन घेतले, साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविले व तपासाअंती आरोपी विरोधात वरील गुन्हयांअंतर्गत आरोपपत्र दाखल केले. आरोपीचे वतीने प्रशांत राठोड (सा.क्र. ४ ) यांचा उलटतपास घेण्यात आला.

२०. प्रशांत राठोड (सा.क्र. ४ ) यांनी उलटतपासात कबुल केले की, रेडकरीता वापरण्यात आलेले खाजगी वाहन कोणाच्या मालकीचे होते याबाबतचे कागदोपत्री पुरावा त्यांनी याकामी दाखल केलेला नाही. त्यांनी पुढे हेही कबुल केले की, सुरेंद्र दुध डेअरी ही साक्री रोडवरील मोठी दुध डेअरी असुन सदर दुध डेअरीवर दुध खरेदी करण्याकरीता येत असतात. परंतु, त्यांनी याकामी सदर दुध डेअरीच्या मालकाचा अथवा कर्मचा-याचा याकामी जबाब नोंदविलेला नाही. त्यांनी पुढे कबुल केले की, जप्तीची कारवाई त्यांनी घटनास्थळी केलेली नाही. तसेच, आरोपी व मुद्देमाल घटनास्थळावर मिळुन आल्याबाबतचा पंचनामा देखील त्यांनी घटनास्थळावर तयार केलेला नाही. त्यांनी पुढे कबुल केले की, जप्त मुद्देमालाचा पंचनामा तयार करुन, मुद्देमालाची पावती फाडुन सदर मुद्देमाल त्यांनी संबंधीत कर्मचा-याच्या ताब्यात दिला.

२१. प्रशांत राठोड (सा.क्र. ४) यांनी पुढे कबुल केले की, मुद्देमाल कारकुनाकडुन अन्न व सुरक्षा अधिकारी यांनी मुद्देमाल घेवुन त्यातील नमुना अन्न व सुरक्षा अधिकारी यांनी घेतल्याबाबतचा स्वतंत्र पंचनामा त्यांनी तयार केला नाही. त्यांचे जबाबात पुढे असे आले आहे की, जप्ती पंचनामा तयार करतांना त्यांनी मुद्देमालास लावलेले कागदी सिल अन्न व सुरक्षा अधिकारी यांनी त्यातुन सँपल नमुना घेतेवेळेस जपुन ठेवला की नाही ते त्यांना माहित नाही. त्यांनी पुढे कबुल केले की, अन्न व सुरक्षा अधिकारी यांनी नमुन्याकरीता मुद्देमालातील पाकीट काढुन घेतल्यानंतर मुद्देमाल किती संख्येने कमी झाला याची त्यांनी पडताळणी केली नाही. त्यांनी पुढे हेही कबुल केले की, याकामी त्रयस्त साक्षीदाराचा जबाब त्यांनी नोंदविलेला नाही. या व्यतिरीक्त सदर साक्षीदाराच्या जबाबातुन अभिलेखावर काहीही आलेले नाही.

२२. अशा प्रकारे सरकार पक्षाने सादर केलेल्या जाबजबाबाचे बारकाईने अवलोकन करता, भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२८ गुन्हयात सरकारपक्षास हे शाबीत करणे आवश्यक आहे की, गुन्हा करण्याच्या किंवा गुन्हा करण्यास मदत करण्याचे उद्देशाने आरोपीने हानीकारक विषारी, गुंगी आणणारे किंवा मादक पदार्थ देवुन एखादयाला इजा पोहचविण्यास कारणीभुत होणे. परंतु, प्रस्तुत प्रकरणात विषारी हानीकारक पदार्थ आरोपीच्या ताब्यातुन जप्त केले गेल्याचे सरकारपक्षाने शाबीत केल्याचे दिसुन येत नाही. तसेच, तपासी अधिकारी यांनी जप्त केलेला मुद्देमाल हा विषारी पदार्थ आहे हे शाबीत करण्यासाठी सरकार पक्षाने रासायनिक प्रयोगशाळेतुन त्याची तपासणी करुन तसा अहवाल नि.क्र. २६ वर जरी दाखल केलेला असला तरी सदर मुद्देमाल नमुने प्रयोग शाळेत पाठविते वेळेस ते निश्चित प्रोटोकॉलनुसार हाताळले होते. सिलबंद केलेल्या अवस्थित वाहतुक केले गेले होते. याबाबत सरकार पक्षाने पुरेसा विश्वसनीय ठोस पुरावा अभिलेखावर आणलेला नाही. तसेच, भारतीय दंड विधान संहितेतील कलम २७२, २७३ हे विक्रीच्या उद्देशाने अन्न किंवा पेय पदार्थामध्ये भेसळ करण्याबद्दल व विक्री करण्यासंबंधी आहे. सरकार पक्षाने स्वतंत्र साक्षीदार देवुन हे सिध्द केले नाही की, आरोपीने सदर खादय पदार्थ विकण्याचे उद्देशाने त्यात भेसळ केली आणि विक्री केली.

२३. अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ मध्ये जप्ती पंचनामा संदर्भात थेट 'पंचनामा' हा शब्द वापरलेला नसला तरी जप्ती, तपासणी आणि नमुना घेण्याची स्पष्ट तरतुद आहे. कलम ३८ नुसार अन्न सुरक्षा अधिकारी यांना शंका असल्यास अन्न पदार्थाचे नमुने घेण्याचा अधिकार आहे ते नमुने घेतल्यानंतर त्याचा संदर्भीत प्रयोग शाळेमध्ये विश्लेषणासाठी पाठविला जातो. तसेच, नमुने घेतांना संबंधीत व्यक्ती (ज्याच्याकडुन नमुने घेतले जात आहे) त्याचे समोर ती प्रक्रिया करावी लागते. तसेच, अन्न पदार्थाचा नमुना घेतल्यानंतर तो अन्न व्यवसायिकाच्या सुरक्षित ताब्यात अन्न पदार्थ ठेवेल त्यावेळी तेवढयाच किंमती एवढा एक किंवा अधिक जामीन बंधपत्र लिहुन देण्यास भाग पडेल. तसेच, कोणताही नमुना घेतला असेल तेथे, त्या अन्न पदार्थाची सर्व

साधारणपणे ज्या भावाने ग्राहकास विक्री केली जाते, त्या भावाप्रमाणे हिशोब करुन त्या व्यक्तीस (जिच्याकडुन नमुना घेतला) पैसे देईल. तसेच, जर तो अन्न पदार्थ नाशवंत असेल किंवा मानव सेवनास योग्य नाही, एवढा खराब आहे असे त्याचे मत होईल त्यावेळी अन्न व्यवसायिकास लेखी सुचना दिल्यानंतर तो नष्ट करण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल. तसेच, अन्न सुरक्षा अधिकारी प्रवेश करण्याच्या आणि कोणत्याही जागेची पाहणी करण्याच्या अधिकारांचा वापर करतांना शक्य असेल तितपत फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहितेतील तरतुदी अन्वये झडतीचे वॉरंट काढल्यानंतर त्या जागेत प्रवेश करण्याच्या, पाहणी करण्याच्या बाबतीत पोलीस अधिका-याला जे अधिकार असतात त्याचा वापर करील. तसेच, कोणताही उत्पादक किंवा वितरक किंवा व्यापा-याकडे अन्न पदार्थात वापरण्यात येणा-या भेसळीचा पदार्थ मिळाला व त्यासंबंधी तो अन्न सुरक्षा अधिका-यास समाधानकारक जबाब देवु शकत नसेल आणि त्यासंबधी त्याचेकडे कोणत्याही अशा कब्ज्याबद्दल जी हिशोबाची पुस्तके किंवा इतर दस्तऐवज तपासाकरीता किंवा कार्यवाही उपयोगी असतील तर ते जप्त करु शकेल. परंतु, हिशोबाची पुस्तके किंवा इतर दस्तऐवज हे वरील अधिका-याच्या पुर्व मंजूरी शिवाय जप्त करण्यात येणार नाही अशी तरतुद आहे.

२४. तसेच, अन्न सुरक्षा अधिकारी जी जप्तीची पाहणीची व प्रवेश करण्याची कलम ३८ प्रमाणे कार्यवाही करेल, तेंव्हा तो एक किंवा अधिक माणसांना अशा कार्यवाहीचे वेळी हजर राहण्यास बोलावुन त्याचे समक्ष कार्यवाही करेल.

२५. तसेच, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम ४१ नुसार शोध, जप्ती, तपास, फिर्याद व त्यातील कार्यवाहीबाबत तरतुद आहे व त्यानुसार कायदयाचे कलम ३१(२) मध्ये काहीही म्हटले असेल तरी, अन्न सुरक्षा अधिकारी यास अन्न पदार्थाच्या बाबतीत अपराध घडला आहे असा संशय आला तर तो अन्न ठेवलेल्या जागेत शोध घेवु शकेल व त्यास अन्न साठा किंवा भेसळीचा पदार्थ आढळल्यास तो जप्त

करुन केलेल्या कार्यवाहीची निर्देशित अधिका-यास लेखी स्वरुपात कळवेल. तसेच, जप्त केलेल्या वस्तुंचा तपशिल लिहुन ठेवावा लागतो. तसेच जप्ती दरम्यान साक्षीदारांच्या उपस्थितीत तपशिलवार नोंद पंचनामा स्वरुपात तयार करणे आवश्यक आहे. जसेकी, फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहितानुसार वापरले जाते.

२६. तसेच, अन्न सुरक्षा कायदयाचे कलम ४२ नुसार खटला भरण्याची कार्यपध्दती बाबत तरतुद आहे व त्यानुसार अन्न व्यवसायाचे निरीक्षण, नमुने घेणे व ते विश्लेषणाकरिता अन्न विश्लेषकाकडे पाठविणे याची जबाबदारी अन्न पुरठा अधिका-यावर आहे. तसेच, अन्न विश्लेषक, अन्न सुरक्षा अधिका-याकडुन अन्नाचा नमुना प्राप्त झाल्याचे त्याचे विश्लेषण करुन विश्लेषण अहवाल ज्यात नमुना घेतलेली पध्दत व विश्लेषणाचा ऊहापोह करुन चौदा दिवसांचे आत त्याची प्रत निर्देशित अधिका-यास पाठवेल व एकप्रत अन्न सुरक्षा आयुक्तास देईल. तसेच, निर्देशित अधिकारी अन्न विश्लेषकांकडुन आलेल्या अहवालाचे विश्लेषण करेल व उल्लंघनाचे स्वरुप हे कारावासाचे शिक्षेस पात्र आहे किंवा फक्त दंडास पात्र आहे याचा निर्णय करुन, उल्लंघनाचे स्वरुप कारावासाचे शिक्षेस पात्र असल्यास चौदा दिवसाचे आत त्यासाठी शिफारस करुन अन्न सुरक्षा आयुक्ताकडे खटला दाखल करण्याबाबत मंजूरीकरीता पाठवेल. तसेच, फौजदारी व्यवहार प्रक्रिया संहितेचे कलम १०० नुसार बंदिस्त जागेचा ताबा ज्याच्याकडे असेल त्या व्यक्तीने झडतीस मुभा दयावयाची तरतुद आहे, कलम १०२ मध्ये विवक्षित मालमत्ता अभिग्रहण करण्याचा पोलीस अधिका-याचे अधिकारबाबत तरतुद आहे. तसेच, फौजदारी व्यवहार संहितेचे कलम १०० व १०२ नुसार जेंव्हा कार्यवाही केली जाते, तेंव्हा त्याबाबत पंचनामा करणे आवश्यक असते. ज्यामध्ये साक्षीदारांच्या समोर जप्ती करणे, जप्त केलेल्या वस्तुंचे वर्णन अणि यादी तयार करणे व दोन्ही साक्षीदारांनी व अधिका-यांनी त्यावर स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. तसेच, कलम १०२ (२) मध्ये केलेल्या कार्यवाहीची माहिती ताबडतोब संबंधीत दंडाधिका-याला देणे आवश्यक आहे.

२७. जप्तीचे कारण नमुद करणे हे तपास अधिका-यास आवश्यक आहे. कारण ते त्याचे महत्वाचे कर्तव्य आहे व या तरतुदीचा उद्देश असा आहे की, जप्ती का केली ? हे स्पष्ट केल्याने त्यात पारदर्शकता येते व भविष्यात त्यात शंका घेतली जात नाही. तसेच, न्यायालयात जप्तीचा पंचनामा व तपास अहवाल सादर केले जाते, तेंव्हा जप्तीचे कारण काय होते हे स्पष्ट असणे गरजेचे असते, अन्यथा संपुर्ण जप्तीची प्रक्रिया 'मनमानी' होवु शकते. तसेच, जप्ती करतांना गुन्हयाची शंका यावर आधारित कार्यवाही असते आणि ही शंका का निर्माण झाली हे नमुद करणे आवश्यक असते.

२८. अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ चे व भारतीय दंड संहिता कलम ३२८, २७२, २७३ व १८८ चे तरतुदीचे अवलोकन करुन सरकार पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, किशोर बाविस्कर (सा.क्र. २) अन्न सुरक्षा अधिकारी तथा फिर्यादी यांचे पुराव्याला दुजोरा देणारा इतर त्रयस्त साक्षीदारांचा व पंच साक्षीदाराचा जबाब सरकार पक्षाने याकामी नोंदविलेला नाही. या बाबीचा विचार केल्यास सरकार पक्षाने सदर केलेल्या मेमोरेडंम व जप्ती पंचनाम्याबाबत साशंकता निर्माण होते.

२९. तसेच, अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे कलम ४१ मध्ये स्पष्ट सांगीतले आहे की, जप्तीचे कारण हे लेखी स्वरुपात दयावे. शोध पंचनामा व जप्ती पंचनामा अहवाल शाबीत करणे सरकार पक्षाला अत्यंत महत्वाचे आहे. परंतु, सरकार पक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे वरील कायदेशीर तरतुदीचे अनुषंगाने विचार करता, याकामी अन्न सुरक्षा व मानके अधिनियम, २००६ चे तरतुदीचे कोटेकोरपणे पालन झाल्याचे दिसुन येत नाही. परिणामता असे दिसुन येते की, सरकार पक्षाने, आरोपी विरुध्द तो भा.द.वि. सं. कलम ३२८, २७२, २७३, १८८ प्रमाणे शिक्षेस पात्र असणा-या गुन्हयासाठी आवश्यक घटक दर्शविणारा ठोस पुरावा अभिलेखावर सादर केलेला नाही. तसेच, आरोपीने शासनाने प्रतिबंधीत केलेले तंबाखुजन्न पदार्थ विक्री करण्याच्या

उद्देशाने प्राप्त करुन राखुन ठेवला ही बाब सरकार पक्षाने अन्न सुरक्षा आणि मानके अधिनियम २००६ चे कलम २६(२)(iv), २७(३)(डी), २७(३)(इ), ३०(१)(zz)(i) व ३(१)(zz)(v) सह कलम ५९ अन्वये शाबीत केलेले नाही. तसेच जप्त मुद्देमाल हा विषारी किंवा हाणीकारक असल्याबाबतचा रासायनिक पृथ्थकरण अहवाल सरपक्षाने जरी अभिलेखावर नि.क्र. २६ वर दाखल केलेला असला तरी सदर अहवालातील मजकुर सरकार पक्षाने भारतीय पुरावा कायदा/भारतीय साक्ष अधिनियम चे तरतुदीस अधिन राहुन शाबीत केल्याचे दिसुन येत नाही. या सर्व बाबींचा विचार करता माझे मते सरकार पक्षाने आरोपी विरुध्दचा गुन्हा सर्व शंके पलिकडे जावुन शाबीत केलेला नाही. तेंव्हा आरोपी सदर गुन्हयातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. म्हणुन मी मुद्दा क्र. १ ते ७ चा निष्कर्ष नकारात्मक देत असुन, मुद्दा क्र. ८ चे निष्कर्षाकरीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. आरोपी नितेश प्रकाशलाल अहुजा यांची भारतीय दंड विधान संहितेचे कलम ३२८, २७२, २७३, १८८ व अन्न सुरक्षा मानके अधिनियमचे कलम २६(२)(iv), २७(३)(डी), २७(३)(इ), ३०(१)(zz)(i) व ३(१)(zz)(v) सह कलम ५९ चे गुन्हयातुन फौजदारी व्यवहार संहितेचे कलम २३५ (१) चे तुरतुदीनुसार निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपी याने दिलेला जामीन कदबा व व्यक्तीगत जाच मुचलका रद्द करण्यात येतो.

३. आरोपीने मुद्देमाल ऑरेंज रंगाची स्वीप्ट व्ही.डी.आय. मॉडेलची कार क्र. एम.एच.१८/टी-१२५३ बाबत दाखल केलेले बंदपत्र अपिलाची मुदत संपल्यानंतर रद्द करण्यात येते.

४. प्रकरणातील जप्त मुद्देमाल विमल गुटखा व व्ही-१ सुगंधीत तंबाखु अन्न

सुरक्षा अधिकारी यांनी पुर्वीच नियमानुसार नष्ट केल्यामुळे त्याबाबत आदेश नाही.

५. आरोपीस आदेशीत करण्यात येते की, त्याने फौजदारी व्यवहार संहितेचे कलम ४३७अ तरतुदीनुसार वरिष्ठ न्यायालयात हजर राहणे कामी रक्कम रु.१५,०००/- चा व्यक्तीगत जाच मुचलका व जामीन कदबा सादर करावा.

(वरील न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला).

SHRIHARI JANARDAN GAIKWAD

Digitally signed by SHRIHARI JANARDAN GAIKWAD
Date: 2026.03.12 17:09:09 +0530

दिनांक - ११.०३.२०२६

(एस.जे. गायकवाड)
अतिरीक्त सत्र न्यायाधीश, धुळे

Dictated on : 11/03/2026
Transcribed on : 11/03/2026
Checked on : 12/03/2026
Retyped on : 12/03/2026
Signed on : 12/03/2026

**<u>दाखला</u>**

दाखला देण्यात येतो की, पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | संजय एच. पाटील |
| न्यायालयाचे नाव | : | तदर्थ जिल्हा न्यायाधिश-१ तथा अति. सत्र न्यायाधीश, धुळे यांचे न्यायालय. |
| पीडीएफ अपलोड केल्याचा दिनांक | : | १२.०३.२०२६ |

सही/-
लघुलेखक
(श्रे.१)